**विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार राज्यात उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत पदवी, पदव्युत्तर व पदविका संस्था तसेच अकृषि विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठ यातील प्राचार्यांच्या पदांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २०१५/प्र.क्र.४८४/१५/वि.शि.१**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२
दिनांक :-१२ जुलै, २०१६

__वाचा :-__

१) शासन निर्णय क्रमांकः उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०१०/(५०३/१०)/वि.शि.-१, दि.२५ फेब्रुवारी, २०११
२) शासन निर्णय क्रमांकः उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०१०/(५०३/१०)/वि.शि.-१, दि.०५ मार्च, २०११
३) शासन निर्णय क्रमांकः उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०११/(३९६/११)/वि.शि.-१, दि.२३ नोव्हेंबर, २०११
४) शासन शुध्दीपत्रक क्रमांकः उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०११/(३९६/११)/वि.शि.-१, दि.२३ फेब्रुवारी, २०१२
५) शासन निर्णय क्रमांकः उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०११/(३७०/११)/वि.शि.-१, दि.२८ मार्च, २०१२
६) शासन निर्णय क्रमांकः उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०११/(५३२/११)/वि.शि.-१, दि.२२ ऑगस्ट, २०१२
७) शासन निर्णय क्रमांकः उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०११/(५३२/११)/वि.शि.-१, दि.११ ऑक्टोबर,२०१२
८) शासन निर्णय क्रमांकः आदिवासी विकास विभाग क्र.टिएसपी-१०८६/८७१०/प्र.क्र.३१/का-५, दि.९ मार्च, १९९०
९) शासन निर्णय क्रमांकः नियोजन विभाग क्र.डोंविका-२००९/प्र.क्र.६/का.१४८३, दि.१८ जानेवारी, २०१०.

__प्रस्तावना:-__

राज्यातील अकृषि विद्यापीठे व शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने येथील प्राचार्यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयात वाढ करण्याचा निर्णय शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये घेतला आहे.

मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी त्यांच्या दि.१४ ऑगस्ट, २०१२ च्या पत्रात विद्यापीठे व अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील अध्यापकांच्या सेवानिवृत्तीच्या वयाबाबत यापूर्वी ज्या अटी घालून दिलेल्या होत्या, त्यामध्ये सुधारणा करुन अध्यापकांच्या सेवानिवृत्तीच्या वयाबाबत त्या त्या राज्य शासनाने त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा, असे नमूद केले आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र.५५२७-५५४७/२०१३ मध्ये सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याचा निर्णय त्या त्या राज्य शासनाचा राहील, असा निर्णय दिला आहे.

संदर्भाधीन क्र.२ येथील दि.५ मार्च, २०११ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातील ज्या शासकीय संस्था/महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित शासकीय तंत्र महाविद्यालये/पदविका संस्था/महाविद्यालयातील प्राचार्यांचे वय ५८ वरुन ६५ वर्षे व अकृषि विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्यांचे वय ६० वरुन ६५ वर्षे करण्यात आलेले आहे, त्यामधील राज्याच्या ग्रामीण, डोंगराळ व आदिवासी भागात पात्र प्राचार्यांची कमतरता असल्याची बाब लक्षात घेता राज्यातील ग्रामीण, डोंगराळ व आदिवासी भागातील उच्च शिक्षण क्षेत्रातील शासकीय संस्था/महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित शासकीय तंत्र महाविद्यालये/पदविका संस्था/महाविद्यालये व अकृषि विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयात ६० वर्षांवरुन ६५ वर्षे वाढ करण्याच्या निर्णयाचा फेरविचार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

२. त्यानुसार मंत्रिपरिषदेच्या मान्यतेनुसार शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे :-

१) संदर्भाधीन क्र.२ येथील दि.५ मार्च, २०११ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातील ज्या शासकीय संस्था/महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित शासकीय तंत्र महाविद्यालये/पदविका संस्था/महाविद्यालयातील प्राचार्यांचे वय ५८ वरुन ६५ वर्षे व अकृषि विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्यांचे वय ६० वरुन ६५ वर्षे करण्यात आलेले आहे, त्यामधील राज्याच्या ग्रामीण, डोंगराळ व आदिवासी भागात पात्र प्राचार्यांची कमतरता असल्याची बाब लक्षात घेता राज्यातील ग्रामीण, डोंगराळ व आदिवासी भागातील उच्च शिक्षण क्षेत्रातील शासकीय संस्था/ महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित शासकीय तंत्र महाविद्यालये/पदविका संस्था/महाविद्यालये व अकृषि विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ६० वरुन सरसकट ६५ वर्षे करण्यात येत आहे. सदर निर्णय शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येईल.

२) वर क्र.१ येथे नमूद केलेली ग्रामीण, डोंगराळ व आदिवासी भागातील महाविद्यालये खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत :-

अ) संदर्भाधीन क्र.८ येथील शासन निर्णयातील विवरणपत्र अ व ब (Annexure-I व II) मध्ये दर्शविण्यात आलेल्या गावांमधील अकृषि विद्यापीठे/शासकीय संस्था/महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित शासकीय तंत्र महाविद्यालये/पदविका संस्था/महाविद्यालये/अशासकीय अनुदानित महाविद्यालये आदिवासी क्षेत्रातील समजण्यात यावीत.

आ) संदर्भाधीन क्र.९ येथील शासन निर्णयातील परिशिष्ट-२ मध्ये दर्शविण्यात आलेल्या गावांमधील अकृषि विद्यापीठे/शासकीय संस्था/महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित शासकीय तंत्र महाविद्यालये/पदविका संस्था/महाविद्यालये/अशासकीय अनुदानित महाविद्यालये डोंगराळ क्षेत्रातील समजण्यात यावीत.

इ) राज्यातील ग्रामपंचायत क्षेत्रातील अकृषि विद्यापीठे/शासकीय संस्था/महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित शासकीय तंत्र महाविद्यालये/पदविका संस्था/महाविद्यालये/अशासकीय अनुदानित महाविद्यालये ग्रामीण क्षेत्रातील समजण्यात यावीत.

३) राज्याच्या उर्वरित भागातील उच्च शिक्षण क्षेत्रातील शासकीय संस्था/ महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित शासकीय तंत्र महाविद्यालये/पदविका संस्था/महाविद्यालयातील प्राचार्यांचे वय ५८ वरुन ६५ वर्षे व उर्वरित अकृषि विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील

प्राचार्यांचे वय ६० वरुन ६५ वर्षे करण्याबाबत संदर्भाधीन क्र.२ अन्वये दि.०५ मार्च, २०११ अन्वये घेण्यात आलेला निर्णय पूर्वीप्रमाणेच कायम ठेवण्यात येत आहे. त्यांच्याबाबतीत संदर्भाधीन क्र.२,३ व ४ येथील शासन निर्णयांतील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

४) महाराष्ट्र नागरी सेवा नियमांमध्ये वरीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईल.

सदर शासन निर्णय मंत्रिपरिषदेच्या मान्यतेनुसार व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.४५/सेवा-४, दि.२८.०३.२०१६ नुसार त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०७१३११२५२८८४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Siddharth Rambhau Kharat

Digitally signed by Siddharth Rambhau Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Siddharth Rambhau Kharat
Date: 2016.07.13 12:58:17 +05'30'

(सिध्दार्थ खरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPAX-2690571, 293730
FAX : 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333 Affi. Ext. 9089, 9090
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६९०५७१ (विस्तारीत क्रमांक - ९०८९, ९१३६)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३ व २६९२३३३.
Website : www.unishivaji.ac.in e-mail : affiliationt1@unishivaji.ac.in
Estd : 1962
NAAC 'A' Grade
MHRD-NIRF-28th Rank

जा.क्र.एसयु/संलग्नता/टे.५/लोहार/ 107 दिनांक : 31 AUG 2016

प्रति,
मा.प्राचार्य, संलग्न महाविद्यालये व संचालक, मान्यताप्राप्त शिक्षण संस्था यांना प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

सदरचे पत्र/ परिपत्रक/ शासन निर्णय विद्यापीठाच्या www.unishivjai.ac.in या संकेतस्थळावर BCUD- Affiliation-T.1 Circulars या ठिकाणी उपलब्ध आहे.